मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» शुक्रवार, दि. 14 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# ठाकरे+काँग्रेस "आघाडी" सर्व जागा लढवणार!

## ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांचे सूतोवाच : पहिल्या टप्प्यातील इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण

**पिंपरी | प्रतिनीधी**

शहरात दोन्ही राष्ट्रवादीचे गट एकत्र येण्याच्या हालचालींनी रंग चढत असतानाच, आता शिवसेना उद्धव ठाकरे गट- मनसे आणि काँग्रेसने महापालिकेच्या सर्व जागांवर एकत्र लढण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे शिवसेना उबाठा+ मनसे+ काँग्रेस अशी "आघाडी" भाजपा आणि राष्ट्रवादीशी दोनहात करणार आहे, असे चित्र निर्माण झाले आहे.




शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनी याबाबत सूतोवाच केले. त्यांच्याकडे मावळ लोकसभा आणि पिंपरी-चिंचवड शहराची जबाबदारी आहे. शहरातील 32 प्रभागांमध्ये इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहेत. वाघेरे म्हणाले की, "पहिल्या टप्प्यात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण झाल्या असून, आघाडीच्या माध्यमातून सर्वच १२८ प्रभागांवर आमची लढत होणार आहे." त्यांनी पुढे म्हटले की, काँग्रेससोबत समन्वय बैठका सुरू आहेत आणि 'महाविकास आघाडी' (ठाकरे गट + मनसे + काँग्रेस + इतर पुरोगामी संघटना) म्हणून प्रत्येक प्रभागात भाजपाविरुद्ध मजबूत उमेदवार उभे करण्यात येणार आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने महाविकास आघाडीत एकत्रित निवडणूक लढवली. किंबहुना, विधानसभा निवडणुकीत शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तिनही मतदार संघांमध्ये "तुतारी"च्या चिन्हावर उमेदवार देण्यात आले होते. त्याच वेळी निष्ठावंत शिवसैनिकांनी एकप्रकारे उठाव केला होता.

> महानगरपालिका निवडणूक शिवसेना ठाकरे गट+ मनसे आणि काँग्रेस एकत्रित लढण्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतली. आम्ही शहरातील सर्व 128 जागांवर उमेदवार देणार आहोत. त्याअनुशंगाने आम्ही मुलाखती सुरू केल्या आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेनेला मानणारा मतदार वर्ग आहे. मनसे आणि काँग्रेस एकत्रित ताकद झाली, तर निश्चितपणे भाजपासमोर तगडे आव्हान उभे राहील.
>
> - संजोग वाघेरे, शहराध्यक्ष, शिवसेना उबाठा, पिंपरी-चिंचवड.

आता आगामी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. काँग्रेसच्या प्रदेश नेत्यांकडून दोन्ही ठाकरेंसोबत एकत्र निवडणूक लढवण्याबाबत मतभिन्नता व्यक्त केली जात आहे. राष्ट्रवादी शरद पवार गट महाविकास आघाडीला सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत लढल्यास शिवसेना ठाकरे गट एकाकी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाकरे बंधू आणि काँग्रेस अशी "आघाडी" करण्याबाबत प्रदेश पातळीवर हालचालींना वेग आला आहे.



# प्रभाग 1, 2, 3 मध्ये पुणे-मुंबईचा पॅटर्न?

## शिवसेना (शिंदे-ठाकरे) आणि मनसेचा प्रभाव नाही; भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस थेट लढत!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १,२,३ मध्ये शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि मनसेचे उमेदवार सध्या मिळत नाहीत, त्यामुळे येत्या महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजप यांच्यात थेट लढतीचे चित्र दिसत आहे. या कारणामुळे अन्य पक्षांच्या इच्छुकांनी नशीब आजमवण्याचा धोका पत्करण्यास उत्सुकता कमी आहे. असेच सध्या चित्र आहे.




### पक्षांची आखणी आणि स्थानिक वातावरण

» शिवसेना (ठाकरे/शिंदे) व मनसेचे कार्यकर्ते या भागातील थेट लढतीपासून दूर आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी व भाजप या दोनच पक्षांत प्राथमिक मुकाबला होईल अशी अपेक्षा आहे. प्रभागातील स्थानिक मतदारसंघात पक्ष बदल, मतदार नाराजी व विकासकामांच्या मुद्द्यावर लढत रंगणार आहे. आरपीआयचा भाजपसोबत भागीदारी आहे, परंतु त्यांचे अस्तित्व प्रभाग १, २ व ३ फारसे निर्णायक नसणार आहे. उमेदवारांचा अभाव हाच निवडणुकीतील खास मुद्दा बनत आहे. मतविभाजन कमी झाल्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी यांच्यात थेट स्पर्धा असेल, त्यामुळे विकास, स्थानिक समस्या आणि पक्षाची कार्यक्षमता या मुख्य निवडणूक मुद्द्यावर प्रचार चालेल. येथे समाविष्ट भाग व राजकीय गटबाजी यातील बदल २०२५ च्या महापालिका निवडणुकीत मोठा परिणाम घडवू शकतो.

**या प्रभागांतील उमेदवारी आणि राजकीय स्थिती**

प्रभाग १,२,३ मध्ये शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट आणि मनसे उमेदवारांचा अभाव दिसत आहे. या पक्षांचे स्थानिक कार्यकर्ते आणि इच्छुक अपुऱ्या पक्ष, संघटन किंवा संभाव्य अपयशामुळे उमेदवारीसाठी पुढे येत नाहीत. मनसेचा २०१७ मध्ये केवळ एक नगरसेवक निवडून आला होता. २०२५ मधील निवडणुकीत मनसेच्या यशाची शक्यता कमी असल्याचे चित्र आहे, तरी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि मनसे यांची युती होण्याची शक्यता बळावल्याने मनसेचे कार्यकर्ते अधिकतम जागा लढवण्याचा दावा करत आहेत.

शिवसेना ठाकरे गटाकडे महापालिकेचा अनुभव असणारे काही निवडक चेहरे असले तरी प्रभाग १,२ व ३ मध्ये पक्षाची सक्रियता अपुरी आहे. शिंदे गटाचेही कार्यकर्ते उमेदवार होण्यास अनिच्छुक आहेत. भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे दोन प्रमुख पक्ष या तीन प्रभागात थेट लढत लढतील असा अंदाज आहे. प्रभाग १,२,३ मध्ये समाविष्ट क्षेत्र नवीन प्रभाग संरचनेसाठी अंतिम स्वरूप २०२५ अखेरीस जाहीर करण्यात आले होते.

## चऱ्होली येथे तरुणाचा खून, फॉर्च्यूनर गाडीत मित्रांनीच केला गोळीबार



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील चऱ्होली भागातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मित्रांनी एका व्यावसायिकावर गोळीबार केला आहे. यात ३७ वर्षीय नितीन शंकर गिलबिले यांचा मृत्यू झाला आहे. चऱ्होली येथील अलंकापुरम चौकाजवळ ही घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलंकापुरम ९० फुटी रोडवर श्री साई रोड कॅरिअर या ठिकाणी साडेपाच ते ६ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. या ठिकाणी काळ्या रंगाच्या फॉर्च्यूनर गाडीत बसलेले असताना नितीन शंकर गिलबिले यांच्यावर त्यांचेच मित्र अमित जीवन पठारे (रा.पठार मळा) आणि विक्रांत ठाकुर (सोलू खेड) यांनी गोळीबार केला. या गोळीबारात नितीन गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांचा मृत्यू झाला आहे.

मयत नितीन गिलबिले आणि अमित पठारे, विक्रांत ठाकूर हे तिघेही एकमेकांचे मित्र असल्याची माहिती समोर आली आहे. हे तिघे जमिनीच्या प्लॉटिंगचा व्यवसाय करत होते. याच व्यवसायामधील व्यवहाराच्या वादातून हा गोळीबार केला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या गोळीबारानंतर अमित पठारे हे विक्रांत ठाकूर फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. या दोघांचा शोध घेतला जात असून दिघी पोलीसांनी या घटनेबाबत अधिक तपास सुरू केला आहे.

## उपायुक्त संदीप खोत यांच्याकडे अग्निशमन तर सिताराम बहुरे यांच्याकडे मध्यवर्ती भांडार विभागाचा अतिरिक्त सोपवला पदभार




**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या आदेशानुसार उपायुक्त संदीप खोत यांच्याकडे अग्निशमन विभागाचा तर उपायुक्त सिताराम बहुरे यांच्याकडे मध्यवर्ती भांडार विभागाचा अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे स्थापत्य मुख्य कार्यालयाचा अतिरिक्त पदभार सोपवण्यात आला आहे.

महापालिकेमध्ये अग्निशमन विभागाचा कार्यभार सांभाळणारे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांची बदली झाली आहे. यामुळे रिक्त झालेल्या अग्निशमन विभागाचा अतिरिक्त कार्यभार पशुवैद्यकीय कामगार कल्याण विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांच्याकडे (पशुवैद्यकीय कामगार कल्याण विभागासह) सोपविण्यात आला आहे.

तर मध्यवर्ती भांडार विभागाचा कार्यभार पाहणारे उपायुक्त निलेश भदाने यांची प्रतिनियुक्ती संपुष्टात आली असून त्यांची पुन्हा त्यांच्या मूळ विभागात बदली झाली आहे. यामुळे रिक्त झालेल्या मध्यवर्ती भांडार विभागाचा अतिरिक्त कार्यभार भूमि आणि जिंदगी विभागाचे उपायुक्त सिताराम बहुरे यांच्याकडे (भूमि आणि जिंदगी विभागासह) सोपविण्यात आला आहे.

तसेच महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील स्थापत्य विभागात सह शहर अभियंता देवन्ना गट्टूवार हे ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. यामुळे रिक्त झालेल्या स्थापत्य विभागाचा अतिरिक्त कार्यभार पाणी पुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे यांच्याकडे (पाणी पुरवठा विभागासह) सोपविण्यात आला आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

## पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 163 अन्वये आदेश जारी केले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ शांततेत, निर्भय आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश जारी केले आहेत, सदरचे आदेश ३ डिसेंबर २०२५ पर्यंत अंमलात राहणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.




### वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे आदीबाबत निर्बंध

» फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्यावाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजुस लावू नये. वाहनावर लावायचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार, प्रतिनिधी, निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

### प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावरील निर्बंध

» कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष, कार्यकर्ते यांनी ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपणाचा वापर करता येणार नाही तसेच प्रचाराकरीता ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, फिरणाऱ्या वाहनास रस्त्यावरुन धावत असतांना ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार व इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधीच्या परवानगीबाबत माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतक, मुद्रणालयाचे मालक व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना पुढील बाबीवर निर्बंध घालण्यात येत आहेत. यामध्ये इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे नमूना मतपत्रिकेसाठी कागद वापरणे तसेच कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिकेची छपाई करणे.

निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तालुका दंडाधिकारी कार्यालये आणि सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय व विश्रामगृह या ठिकाणी कोणत्याही प्रकारची मिरवणूक, सभा घेणे, मोर्चा काढणे, उपोषण करणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने इत्यादी. तसेच कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे या बाबी करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक प्रचाराचे साहित्य, सार्वजनिक इमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर निवडणूकी संबंधी पोर्स्टस, बॅनर्स, पॉम्प्लेटस, कटआऊटस, होर्डिंग्ज , कमानी आदी रहदारीस अडथळा निर्माण होईल व अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे. कोणत्याही राजकीय पक्षानी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी, किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणूक प्रचारासाठी १० पेक्षा अधिक मोटार गाड्या, वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे.

पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश जारी केले आहेत, सदरचे आदेश ३ डिसेंबर २०२५ पर्यंत अंमलात राहणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ तसेच इतर प्रचलित कायद्यांन्वये शिक्षेस पात्र राहील, असेही जिल्हादंडाधिकारी डुडी यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

# पीएमपीचे चाक गतीने फिरणार ? एक हजार ई-बस मंजूर

## प्रधानमंत्री ई-ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाला एक हजार 'ई-बस' खरेदी करण्यास केंद्र सरकारकडून मान्यता मिळाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

प्रधानमंत्री ई-ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपी) एक हजार 'ई-बस' खरेदी करण्यास केंद्र सरकारकडून मान्यता मिळाली आहे. मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच. डी. कुमारस्वामी या प्रस्तावाला मंजुरी दिली. 'लवकरच पीएमपीच्या ताफ्यात या बस दाखल होणार असून, पुण्याची सार्वजनिक वाहतूक प्रदूषणमुक्त आणि गतीमान होण्यास मदत होईल,' अशी माहिती केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.




### 'मेट्रोलाही गती मिळणार'

» महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (महामेट्रो) पुणे, पिंपरी चिंचवड शहरांबरोबर उपनगरांपर्यंत मेट्रो मार्गाचा विस्तार करण्यात येत आहे. मात्र, ज्या ठिकाणी मेट्रो मार्ग नाही, त्या ठिकाणी असलेल्या नागरिकांसाठी पूरक (फिडर) सेवा विस्तार सुरू केला आहे. सध्या शहरात २३ ठिकाणी प्रतिपूरक सेवा सुरू करण्यात आली आहे. पूरक सेवेला ३० टक्केच प्रतिसाद मिळत असल्याचे अभ्यासातून समोर आले होते. पीएमपीच्या ताफ्यात नवीन बस दाखल झाल्यास दळणवळ सुविधा आणखी वाढविण्यात येणार असून पीएमपी ते मेट्रो स्थानक असा सुलभ प्रवास सुरू करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड, उपनगर ते पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडी) हद्दीपर्यंत पीएमपी धावते. सध्या ताफ्यात दोन हजार पीएमपी असून, त्यातील सुमारे ७५० स्वमालकीच्या आहेत, तर उर्वरित ठेकेदारांच्या आहेत. पुणे, पिंपरी चिंचवडचा वाढता विस्तार आणि लोकसंख्या लक्षात घेता किमान तीन हजार पीएमपी आवश्यक आहे.

पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्त सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी पीएम ई-ड्राइव्ह योजनेंतर्गत एक हजार बस देण्याबाबत जाहीर करण्यात आले होते. सुमारे दीड ते दोन वर्षांपासून या ई-बसची प्रतीक्षा असून, प्रशासकीय पातळीवर सातत्याने बैठका, पाठपुरावा सुरू होता. विशेषतः राज्य सरकारकडूनही आर्थिक तरतुदीबाबत चाचपणी करून हालचाली सुरू होत्या. मोहोळ म्हणाले, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सहमती दर्शवून अर्थपुरवठ्याबाबत रिझर्व्ह बँकेला पत्र पाठविण्यात आले आहे. तसेच, पीएमपी प्रशासनामार्फत या 'ई-बस' साठीचा प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे पाठविण्यात आला. एच. डी. कुमारस्वामी यांनी या प्रस्तावाला गती देऊन मंगळवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्तावाला मान्यता दिली. त्यामुळे पीएमपीच्या एक हजार ई-बसचा मार्ग मोकळा झाला आहे.'

# जिल्ह्यात निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी द्या; राष्ट्रवादीतून सूर उमटला

## राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील बहुजन समाजातील कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्यास संघटनवाढीला चालना मिळेल, अशी आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण खुल्या प्रवर्गात जाहीर झाल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटातील निष्ठावंत, तळागाळापर्यंत काम करणाऱ्या कार्यकर्त्याला नगराध्यक्षपदाची संधी द्यावी, अशी मागणी बारामती शहरातून होत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील बहुजन समाजातील (ओबीसी) कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्यास संघटनवाढीला चालना मिळेल, अशी आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

बारामती नगरपरिषदेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर नगराध्यक्षपदाची जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. प्रस्थापित, प्रबळ नेते हे इच्छुकांच्या शर्यतीत आहे. गुरुवारी (दि.१३) रोजी बारामती नगराध्यक्षपदाची उमेदवाराची घोषणा होणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक तोंडावर आहे. जिल्ह्यात कॉंग्रेसचे माजी आमदार संजय जगताप, माजी आमदार संग्राम थोपटे गेले. जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण माने हे भाजपवासी झाले आहेत. जिल्ह्यात राष्ट्रवादी, कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांनी भाजपात प्रवेश केला आहे.

या पडझडीत बारामती नगराध्यक्षपदासाठी तळागाळातील कार्यकर्त्याला जर संधी दिली तर राष्ट्रवादी अजित पवार गटाची प्रतिमा सुधारण्यास मदत होईल. पुण्यातील कोरेगाव पार्क येथील पार्थ पवार यांचे भूखंड प्रकरण चांगलेच तापले आहे. त्यामुळे अजित पवार हे बॅकफूटवर गेले आहेत. त्यात ओबीसी समाजाची नाराजी आहे. त्यामुळे आता सध्या तळागाळात परिस्थिती ही थोडीशी वेगळी आहे, असा अंदाज राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत.

संघटनेला जिल्ह्यात उर्जितावस्था द्यायची असेल तर संघटन बांधणीशिवाय पर्याय नाही. भाजपने तळागाळात सुक्ष्म नियोजन करीत ओबीसी समाजाचा तेली समाजाचे सामान्य कार्यकर्ता असलेले नरेंद्र मोदी यांना मुख्यमंत्री आणि पंतप्रधान पदापर्यंत पोहोचवले आहे. हे उदारण राष्ट्रवादीतील जाणकार देत आहेत. जातीपातीचा विचार सोडून सर्व घटकांतील चांगले कार्यकर्ते सोबत घेत त्यांना संधी द्यावी. हा बदल केला नाही तर भविष्यात संघटना टिकणार नाही, अशी चिंता कार्यकर्त्यातून आणि ओबीसी समाजातून व्यक्त होत आहे.



### भाजपच्या संघटनबांधणीचा अभ्यास गरजेचा

» सोलापूर जिल्ह्यातील विजयसिंह मोहिते पाटील यांच्या बालेकिल्ल्यात भाजपने चर्मकार समाजातील राम सातपुते यांना ताकद देऊन तळागाळात संघटना वाढवली आहे. या केडरमुळे सोलापूर जिल्ह्यातील तरुण भाजपकडे आकर्षित झाले आहेत. राष्ट्रवादीचे माजी आमदार यांनी भाजपमध्ये प्रवेश केले. केडर मजबूत असेल तर संघटना वाढते तसेच टिकते. पुणे जिल्ह्यातील परिस्थिती वेगळी आहे. पक्षाचा केडर असणे गरजेचे आहे. आज राष्ट्रवादीची संघटना मरगळलेली आहे. जिल्ह्यात राष्ट्रवादीची संघटना व्हेंटिलेटरवर आहे. आमदार संघटनेकडे बघत नाही. संघटनेचे मूल्य शून्य आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाने भाजपकडून संघटन बांधणीचे कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे, असे जिल्ह्यातील राष्ट्रवादी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी खासगीत बोलताना सांगितले.

### बारामतीत प्रस्थापितांना संधीचे शल्य

» बारामतीसह जिल्ह्यात प्रस्थापित नेत्याला नेहमीच संधी दिली तर तरुण यापासून दूर जाईल. तरुणाची नकारात्मक मानसिकता होईल. प्रस्थापितांना संधी दिली जाते यावर त्याचे मत तयार होईल. बारामतीत चांगले लोक येत नाही. हे मुख्य कारण आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जे कार्यकर्ते आहेत त्यांची प्रतिमा सुधारण्यास मदत होईल. जो पक्षाचे काम करीत नाही किंवा प्रस्थापितांना संधी दिली तर पक्षाचे कार्यकर्ते काम करू शकणार नाही, असा एक मतप्रवाह निर्माण झाला आहे. अजित पवार यांनी सहकारी संस्था, स्थानिक स्वराज संस्थामध्ये तरुणांना संधी दिली आहे. मात्र तिथे प्रस्थापित नेत्यांच्या मुलांना संधी मिळत आहे. काही अपवाद वगळता ही वास्तवता आहे.

# सासवडला जनमत आघाडीची एंट्री; नगराध्यक्ष आणि सर्वसाधारण जागेसाठी अर्ज दाखल

## सासवड नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनमत विकास आघाडीने आपले अस्तित्व ठळकपणे दाखवले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सासवड नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनमत विकास आघाडीने आपले अस्तित्व ठळकपणे दाखवले आहे. आघाडीतर्फे दोन उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करून निवडणुकीच्या रणसंग्रामाची औपचारिक सुरुवात केली आहे.

नगराध्यक्ष पदासाठी दत्तात्रय युवराज घाटे यांनी जनमत विकास आघाडीतर्फे अर्ज दाखल केला आहे, तर प्रभाग क्रमांक सात 'ब' सर्वसाधारण जागेसाठी कल्याणकर रवि नरसिंग यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या दोन्ही अर्जांमुळे सासवडमध्ये जनमत विकास आघाडी आता सक्रिय झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

स्थानिक राजकारणात गेल्या काही वर्षांपासून जन्मत विकास आघाडीचे वर्चस्व कायम आहे. माजी आमदार संजय जगताप यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे जनमत विकास आघाडी मोडीत निघणार, अशी चर्चा होती. परंतु यावेळी जनमत विकास आघाडीने मैदानात उतरल्यामुळे भाजपसाठी नवीन समीकरणे आणि आव्हाने निर्माण होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आघाडीच्या कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेच्या विविध प्रभागांमध्ये जनसंपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे. शहराच्या विकासाच्या मुद्द्यांवर प्रचार रंगणार असल्याची चर्चा आहे.

शहरातील नागरिकांच्या समस्या, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन आणि वाढती वाहतूक यांसारख्या मुद्द्यांवर जनमत विकास आघाडीने आपले धोरण ठळकपणे मांडण्याची तयारी सुरू केली आहे. "सासवडचा सर्वांगीण विकास आणि जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य" हे घोषवाक्य घेऊन या आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत.



### निवडणूक रंगतदार होणार

» सासवड नगरपरिषद निवडणुकीत यावेळी भाजप आणि जनमत विकास आघाडी यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्तेही जनमत विकास आघाडीला पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याचे समजते. त्यामुळे भाजपऐवजी "जनमत विकास आघाडी" या पॅनलवर निवडणूक लढविण्याची चर्चा अधिक गडद होत आहे. सासवडमध्ये यापूर्वी अनेक लढती पारंपरिक पद्धतीने झाल्या असल्या, तरी यावेळी नव्या राजकीय आघाड्यांच्या प्रवेशामुळे निवडणूक अधिक रंगतदार होणार आहे.